**सोलापूर विद्यापीठ, सोलापूर**

**व्यवस्थापन परिषद कार्यवृत्तांत**

**रविवार, दि. १० जानेवारी, २०१० सकाळी ०७:३० वा.**

**व्यवस्थापन परिषदेची सभा रविवार दि.१०/०१/२०१० रोजी सकाळी ०७:३० वा.** व्यवस्थापन परिषद कक्षात मा. कुलगुरू महोदय यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सभेस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. बी. पी. बंडगर - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | डॉ. ए. एन. बारबोले | सदस्य |
| ३) | डॉ. एल. पी. देशमुख | सदस्य |
| ४) | प्राचार्य डॉ. राजेंद्र एन. शेंडगे, संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ | सदस्य |
| ५) | प्राचार्य श्री. जे. के. बिले | सदस्य |
| ६) | प्राचार्य डॉ. सी. बी. कोळेकर | सदस्य |
| ७) | डॉ. पी. जी. मोरे | सदस्य |
| ८) | श्री. एन. बी. पवार | सदस्य |
| ९) | श्रीमती एन. व्ही. साठे | सदस्या |
| १०) | प्रा. पी. एम. हिरेमठ | सदस्य |
| ११) | प्राचार्य डॉ. एच. एन. जगताप | सदस्य |
| १२) | श्री. बी. पी. रोंगे | सदस्य |
| १३) | श्री. एन. आर. गरड | सदस्य |
| १४) | मा. डॉ. डी. जे. साळुंखे -परीक्षा नियंत्रक | स्थायी निमंत्रित |
| १५) | मा. डॉ. डी. डी. पुजारी -वित्त व लेखा अधिकारी | स्थायी निमंत्रित |
| १६) | मा. कॅप्टन डॉ. नि. पां. सोनजे, कुलसचिव | सचिव |

**स्वागतः**

मा.कुलसचिव यांनी सर्व सदस्यांचे स्वागत करुन सभेस सुरुवात केली.

**सदर सभेत खालील प्रमाणे कामकाज झाले.**

| | |
|---|---|
| **विषय क्र.१** | **दि.२१ डिसेंबर, २००९ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.** |

| | |
|---|---|
| **ठराव क्र.१** | **सदरचा विषय पुढील बैठकीत सादर करावा असे सर्वानुमते ठरले.** |

**विषय क्र.२ महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा.कुलगुरु यांनी सादर करावयाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.**

**(सोबत अहवाल जोडला आहे)**

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.

| | |
|---|---|
| **ठराव क्र.२** | **महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा.कुलगुरु यांनी सादर केलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली.** |

| **विषय क्र.०३** | **विद्यापीठास नव्याने भूसंपादित झालेल्या ४८२ एकर जागेच्या सर्वेक्षणाचे काम करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.** |
|---|---|

(सोबत तौलनिक तक्ता जोडला आहे)

(टिपणी: सोलापूर विद्यापीठास नव्याने ४८२ एकर जागा शासनाकडून भूसंपादित झालेली आहे. या ४८२ एकर जागेचे सर्वेक्षणाच्या कामाकरीता दि.२४/१२/२००९ रोजीच्या लोकमत व दैनिक संचार या स्थानिक वर्तमानपत्रामध्ये जाहीर निविदा प्रसिध्द करण्यात आलेली होती. एकूण १० ठेकेदाराच्या निविदा प्राप्त झालेल्या असून सर्वात कमी दर रु.१,६२,५५०/- इतक्या रुपयांची निविदा मे. व्हनराव एम. एम. लातूर यांची असून सदरचे काम मे. व्हनराव एम. एम. लातूर यांना देण्याबाबत मा.कुलगुरुमहोदयांनी बांधकाम समितीच्या वतीने मान्यता दिलेली आहे.

सबब, ४८२ एकर जागेचे सर्वेक्षणाचे काम मे. व्हनराव एम. एम. लातूर यांना देण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| **ठराव क्र.०३** | **विद्यापीठास नव्याने भूसंपादित झालेल्या ४८२ एकर जागेच्या सर्वेक्षणाच्या कामाबाबत बांधकाम समितीच्या वतीने मा.कुलगुरुमहोदयांनी केलेली कार्यवाही स्विकारण्यात येऊन मे. व्हनराव एम. एम. लातूर यांना तौलनिक तक्त्यानुसार सर्वात कमी दराने रु.१,६२,५५०/- सर्वेक्षणाचे काम देण्यास मान्यता देण्यात आली.** |
|---|---|

**विषय क्र.०४ नियतकालिक प्रकाशित न करणाऱ्या संलग्नित महाविद्यालयांवर दंडात्मक कार्यवाही करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: सध्या ११२ संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठाशी संलग्नित आहेत. यापैकी एकूण १७ महाविद्यालयांनी सन २००८-०९ या वर्षामध्ये नियतकालिके स्पर्धेत सहभाग नोंदविला आहे. उर्वरित महाविद्यालयांशी दूरध्वनीवरुन संपर्क साधला असता, त्यांनी नियतकालिक प्रकाशित केली नसल्याचे निदर्शनास आलेले आहे. याबाबत दि.०८/१२/२००९ रोजी झालेल्या विद्यार्थी कल्याण विभागाच्या नियतकालिक समितीच्या बैठकीत विषय क्र. ०४ अन्वये विषय सादर केला असता त्यावर खालीलप्रमाणे ठराव झालेला आहे.

**ज्या महाविद्यालयांनी अंक प्रकाशित केले आहे त्यांना अभिनंदनपर पत्र पाठवावे व विद्यार्थ्यांकडून फी घेऊनसुध्दा जी महाविद्यालये नियतकालिक काढीत नाहीत अश्या महाविद्यालयांवर दंडात्मक कार्यवाही करण्याचा प्रस्ताव हा व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत मांडून ठराव करुन घ्यावा नंतर महाविद्यालयांवर कार्यवाही करावी.**

उक्त ठरावानुसार, सदरचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र.०४** | **सदरचा विषय पुढील बैठकीत सादर करावा असे ठरले.** |

मा.कुलगुरु यांच्या परवानगीने सभा संपल्याचे मा.कुलसचिव यांनी जाहीर केले.

**सही/-**
**कॅप्टन डॉ. नि. पां. सोनजे**
**सचिव**
**व्यवस्थापन परिषद**

**सही/-**
**डॉ. बा. पां. बंडगर**
**अध्यक्ष**
**व्यवस्थापन परिषद**